किटकशास्त्र विभाग, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

त्वरित प्रसारणासाठी
पीक संरक्षण पत्रिका क्र.१३

जा.क.विप्रकि/ पिसंयो / ७४१ /२०२६
दि. 27/10/2026

तूरीवरील शेंगा पोखरणा-या अळ्यांचे व्यवस्थापण

सध्या तुर हे पिक फुलोरा अवस्थेत आहे. मागील काही आठवडयातील असणारे सतत चे ढगाळ, कोरडे वातावरण व रात्रीचे थंड हवामान तूर पिकावरील शेंगा पोखरणाऱ्या अळीच्या वाढीस पोषक आहे व अश्या वातावरणामुळे तूर पिकाला शेंगा पोखरणाऱ्या अळ्यापासुन नुकसान होण्याची शक्यता आहे. तरी शेतकरी बंधूनी आपल्या पिकाची पाहनी करून वेळीच व्यवस्थापनाचे उपाय योजना करणे आवशक आहे. शेंगा पोखरणा-या अळ्यांमधे खालील प्रकारच्या अळ्यांचा समावेश होतो.


शेंगा पोखरणारी अळी

१. **शेंगा पोखरणारी अळी (हेलीकोवर्पा) :-** या किडीची मादी पतंग तुरीच्या कळ्या, फुले व शेंगा, यावर अंडी घालते. अंडयातून निघालेल्या अळ्या तूरीच्या कळ्या आणि फुले खाऊन नुकसान करतात. पुर्ण वाढ झालेली अळी ३० ते ४० मि.मि. लांब, विविध रंग छटेत दिसुन येते जसे पोपटी, फिक्कट गुलाबी व करडया रंगाची असून तीच्या पाठीवर तुटक करडया रेषा असतात. मोठ्या अळ्या शेंगांना छिद्र करून आतील दाणे पोखरून खातात.


शेंगा पोखरणारी अळीचे नुकसान

२. **पिसारी पतंग :-** या पतंगाची अळी १२.५ मि.मि.लांब हिरवट तपकिरी रंगाची असते. तिच्या अंगावर सुक्ष्म काटे व केस असतात. अळी शेंगावरील साल खरडून छिद्र करते. व बाहेर राहून दाने पोखरते.

३. **शेंगे माशी :-** या माशीची अळी बारीक गुळगुळीत व पांढ-या रंगाची असून तिला पाय नसतात. तोंडाकडील भाग निमुळता व टोकदार असतो. ही अळी शेंगाच्या आत राहून शेंगातील दाने अर्धवट कुरतडून खाते व त्यामुळे दाण्याची मुकनी होते.


पिसारी पतंग

एकात्मिक व्यवस्थापन:

या तिनही किडी कळया, फुले व शेंगावर आक्रमण करीत असल्यामुळे त्यांच्या व्यवस्थापनाकरीता जवळ जवळ सारखेच उपाय योजावे लागतात.

१. प्रति हेक्टर २० पक्षीथांबे शेतात उभारावेत. त्यामुळे पक्षी किडींच्या अळ्या खाऊन फस्त करतात. तसेच घाटे अळीच्या व्यवस्थापनासाठी हेक्टरी २० कामगंध सापळे लावावेत.


शेंग माशी

२. **आर्थिक नुकसान संकेत पातळी :**
   - घाटे अळी ५-६ पतंग प्रती सापळा २-३ दिवसात **किंवा** १ अळी प्रती झाड किंवा ५-१० टक्के नुकसान.
   - पिसारी पतंग ५ अळ्या/१० झाडे अशी आर्थिक नुकसान धोक्याची पातळी गाठताच खालील उपाययोजना कराव्या.
   - शेंगे माशी ५ ते १० टक्के नुकसान ग्रस्त दाणे.

३. **पहिली फवारणी** (५० टक्के फुलोरावर असतांना).
निंबोळी अर्क ५ टक्के **किंवा** अझाडिरेक्टीन ३०० पीपीएम १००० मिली प्रति एकर **किंवा** अझाडिरेक्टीन १५०० पीपीएम ५०० मिली प्रति एकर **किंवा** एच.ए.एन.पि.व्हि (१×१०^{९} पिओबी/मिली) २०० एल.ई. प्रति एकर . **किंवा** बॉसिलस थुरिंनजिएंसिस ३०० मिली प्रति एकर **किंवा** क्विनॉलफॉस २५ ई.सी.,४०० मि.ली. प्रति एकर या प्रमाणे कोणत्याही एका किटकनाशकांची पाण्यात मिसळून फवारणी करावी.

४. **दुसरी फवारणी** (पहिल्या फवारणीनंतर १५ दिवसानी)
इमामेक्टीन बेझोएट ५ एस जी ६० ग्रॅम प्रति एकर **किंवा** लॅब्डा सायहॅलोथ्रीन ५ टक्के ईसी २०० मिली प्रति एकर **किंवा** ईथिऑन ५० टक्के ईसी ५०० मिली प्रति एकर **किंवा** क्लोरॅनट्रॅनीलिप्रोल १८.५ टक्के एस.सी. प्रवाही ६० मिली प्रति एकर याप्रमाणे कोणत्याही एका किटकनाशकांची पाण्यात मिसळून फवारणी करावी.

(डी. बी. उंदीरवाडे)
विभाग प्रमुख
किटकशास्त्र विभाग
डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला

प्रतिलीपी - सर्व स्तरावरून प्रचार व प्रसारा करीता
मा. आयुक्त(कृषि), मा.संचालक (विस्तार) कृषि आयुक्तालय, मा. संचालक (संशोधन), डॉ. पंदेकृवि, मा. संचालक (विस्तार शिक्षण), डॉ. पंदेकृवि, सहसंचालक (कृषि), अमरावती, नागपूर विभाग, सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी व उपविभागीय कृषि अधिकारी, कुलगुरु यांचे तांत्रिक सचिव यांना मा. कुलगुरु, डॉ. पंदेकृवि, सर्व कृषि विज्ञान केंद्र. विद्यापीठाचे माहिती अधिकारी, डॉ. पंदेकृवि, अकोला, सर्व वर्तमानपत्रे

२)घाटे अळी :


पक्षी थांबा

ओळख : या किडींची मादी पतंग पानावर, कोवळया शेंडयावर, कळयांवर व फुलांवर एकेरी अंडी घालते. ही अंडी खसखसीच्या दाण्यासारखी दिसतात. त्यातून २ ते ३ दिवसात अळी बाहेर पडते. ही अळी पानावरील हरीत द्रव्य खरडून खाते. त्यामुळे पाने प्रथम पिवळसर पांढूरकी होऊन वाळतात व गळून पडतात. थोडया मोठया झालेल्या अळया संपूर्ण पाने व कोवळी देठे खाऊन फस्त करतात. त्यामुळे झाडावर फक्त फांदयाच शिल्लक राहतात. पुढे पिक फुलो-यावर आल्यावर हया अळीचा प्रादुर्भाव वाढतो व अळया प्रामुख्याने फुले व घाटयांचे नुकसान करतात. मोठया झालेल्या अळया घाटयाला छिद्र करून आतील दाणे खाऊन घाटे पोखरतात. एक अळी साधारणत: ३० - ४० घाटयांचे नुकसान करते.

एकात्मिक व्यवस्थापन


फेरोमोन सापळा

- घाटे अळीचे परभक्षक उदा. बगळे, मैना, राघो, निळकंठ, काळी चिमणी ईत्यादी पिकामधे फिरून घाटे अळया वेचून त्यांचे पिकावरील नियंत्रण करतात. अवाजवी किटकनाशकाची फवारणी केल्यास पक्षी किटकनाशकांच्या वासामुळे शेतामधे येणार नाहीत. त्यामुळे किटकनाशकाचा जास्त वापर टाळावा.
- ज्या शेतामधे मका किंवा ज्वारीचा नैसर्गिक पक्षी थांबे म्हणुन उपयोग केला नसेल त्या शेतामधे बांबुचे त्रिकोणी पक्षी थांबे (प्रती हेक्टर २० पक्षी थांबे) तयार करून शेतामधे लावावे. त्यामुळे पक्षांचे अळया वेचण्याचे काम सोपे होते.
- कामगंध सापळयाचा वापर करावा. यासाठी घाटे अळीचे कामगंध सापळे (हेक्झाल्युर) एकरी दोन किंवा हेक्टरी पाच सापळे याप्रमाणे लावावेत. सापळयामधे सतत तीन दिवस आठ ते दहा पंतग आढळल्यास किड व्यवस्थापनाचे उपाय योजावेत.
- शेतकरी बंधुंनी आपल्या पिकाचे निरीक्षण करुन किडींचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान संकेत पातळीच्यवर (१ ते २ अळया प्रति मिटर ओळ) आढळून आल्यास किंवा ४० ते ५० टक्के पिक फुलो-यावर आल्यानंतर घाटेअळीचे व्यवस्थापनासाठी खालील प्रमाणे पिक परिस्थिती नुसार फवारणी करावी.


घाटे अळी

<u>पहिली फवारणी (५० टक्के फुलोरावर असतांना)</u>

- निंबोळी अर्क ५ टक्के **किंवा** एच.ए.एन.पि.व्ही (१x१०^{९} पिओबी/मिली) ५०० एल.ई./ हे. **किंवा** क्विनॉलफॉस २५ ई.सी.,२० मि.ली.

<u>दुसरी फवारणी (पहिल्या फवारणीनंतर १५ दिसानंतर)</u>

- स्पिनेटोरम ११.७० टक्के एससी ९ मिली **किंवा**
- इमामेक्टीन बेझोएट ५ टक्के एस जी ४ ग्रॅम **किंवा**
- ईथिऑन ५० टक्के ईसी २५ मिली **किंवा**
- इंडोक्झाकार्ब १५.८० इसी ६.६ मिली **किंवा**
- लॅंबडा सायहेलोथ्रीन ०.५ इसी १० मिली

वरील पैकी कोणत्याही एका किटकनाशकाची प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

टीप : वरील किटकनाशकांची मात्रा ही साध्या नॅपसॅप स्पेअरसाठी शिफारशीत असुन पावर स्प्रेने फवारणी करावयाची असल्यास वरील किटकनाशकांची मात्रा तिप्पट करावी.

(डी. बी. उंदीरवाडे)
विभाग प्रमुख,किटकशास्त्र विभाग
डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला

प्रतिलीपी - सर्व स्तरावरुन प्रचार व प्रसारा करीता

मा. आयुक्त(कृषि), मा.संचालक (विस्तार) कृषि आयुक्तालय, मा. संचालक (संशोधन), डॉ. पंदेकृवि, मा. संचालक (विस्तार शिक्षण), डॉ. पंदेकृवि, सहसंचालक (कृषि), अमरावती, नागपूर विभाग, सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी व उपविभागीय कृषि अधिकारी, कुलगुरु यांचे तांत्रिक सचिव यांना मा. कुलगुरु, डॉ. पंदेकृवि, सर्व कृषि विज्ञान केंद्र. विद्यापीठाचे माहिती अधिकारी, डॉ. पंदेकृवि, अकोला, सर्व वर्तमानपत्रे